Vol 6 Issue 1 July 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 1 | July - 2016

Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal
RNI : MAHMUL/2011/38887
ISSN No: 2231-5063
Impact Factor 2.2052 (UIF) [Yr. 2014]
3.4052 (UIF) [Yr. 2015]
4.6052 (UIF) [Yr. 2016]

GRT Golden Research Thoughts

# 'सत्य' आणि 'अहिंसा' ह्या परम्तत्त्वातील गांधीतत्त्वज्ञान

प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

**प्रस्तावना**

महात्मा गांधी हे खऱ्या अर्थाने तत्त्वज्ञ नव्हते. ग्रंथ स्वरुपात त्यांनी तत्त्वज्ञान दिलेलेही नाही किंवा संकलित स्वरुपात त्यांचे तत्त्वज्ञान पहायला मिळत नाही. असे असले तरी प्रबळ साम्राज्याशी व आधुनिक शस्त्रास्त्रांनी युक्त असलेल्या ब्रिटिशांच्या वर्चस्वातून अजाण, अशिक्षित व सर्वच दृष्टींनी मागासलेल्या या देशास मुक्त करण्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग एकमेव मानला. सत्याग्रह नसता तर भारताला अधिक भयंकर यातना सोसाव्या लागल्या



असत्या. "निराशेच्या या काळ्याकुट्ट ढगाला एकच रूपेरी कडा आहे, आणि ती म्हणजे सत्याग्रहाचा सूर्योदय" असा गांधीजींचा विश्वास होता. त्यांनी 'हिंद स्वराज्य' नावाच्या सुत्रमय ग्रंथात आपला सिद्धांत माडण्याचा पयत्न केला. सत्य, धैर्य व सत्याग्रह ही मनुष्याच्या अंतःकरणाची विविध रुपे असल्याचे सांगून "माणसाने जिवंत राहण्याकरिता मरणाला तयार असले पाहिजे आणि आपले हक्क मिळविण्याकरिता आपण आपले कर्तव्य केले पाहिजे" याचीही जाणीव करून दिली.

सशस्त्र लढ्यात प्रचंड मानवी हानी होवूनही आपला टिकाव लागणार नव्हता. कारण मवाळ व जहाल तसेच सशस्त्र क्रांतिकारकांचा मार्ग फारसा प्रभावी ठरला नसल्याचे गांधीजींनी अभ्यासले होते. अशा पार्श्वभूमीवर महात्मा गांधींना सत्याग्रहाचा मार्ग योग्य वाटणे सहाजिकच होते. त्याकरिता त्यांनी जनतेला उद्देशून केलेले भाषणे, लढा उभारण्याकरिता यंग इंडिया, नवजीवन, हरिजन या नियतकालिकांतील आणि इंडियन ओपिनियनमधील निनावी लिखाण, अनेक लढे, प्रत्यक्ष कृती, आचरण, यातूनच त्यांचे तत्त्वज्ञान आपणास पहावयास मिळते. अत्यंत पराकोटीचे वाटणारे असाध्य असे भारतीय स्वातंत्र्य ज्या तत्त्वज्ञानाच्या मार्गांनी गांधीजींनी साध्य केले ते तत्त्वज्ञान पहाणे महत्त्वाचे तेवढेच आवश्यक वाटते.

### 'सत्य आणि 'अहिंसा' परम्तत्त्वे

महात्मा गांधींचे हे संपूर्ण तत्त्वज्ञान दोनच परमतत्त्वांवर आधारित असल्याचे सांगता येईल. ती दोन तत्त्वे म्हणजे 'सत्य' आणि 'अहिंसा' होत. म. गांधी याविषयी म्हणतात की, भारताची जर पारतंत्र्यांतून मुक्तता होण्याबद्दल खात्री पाहिजे असेल तर तो आपल्याला फक्त सत्य व अहिंसा यांच्या मध्येच मिळेल.

***सत्य :*** 'सत्य' शब्द सत् पासून बनला आहे. अर्थ अस्ति सत्य अर्थात अस्तित्व ! परमेश्वराचे खरे नाव सत् अर्थात सत्य आहे.परमेश्वर सत्य आहे म्हणजेच सत्य हाच परमेश्वर होय.

***अहिंसा :*** जीवनाचे नियामक तत्त्व स्नेह आहे; संघर्ष नव्हे. स्नेह हे प्रगतीचे तत्त्व आहे. या स्नेहाच्या तत्त्वालाच गांधींनी 'अहिंसा' असे नाव

दिले.

सत्याचे संशोधन करीत असतांना अहिंसा हा एक साधा व सोपा मार्ग आहे. ईश्वरास नेहमी सत्य आवडते. म्हणून सत्य म्हणजेच ईश्वर होय. अहिंसा हे सत्य असून त्याचाच पाठपुरावा करण्यात व्यक्तीचे हित असते. अहिंसेस पोषक इतर गोष्टी म्हणजे सत्याग्रह, असहकार, कायदेभंग, उपोषणे, हरताळ इत्यादी होत.

अहिंसा याचा दुसरा अर्थ प्रेम होय. शत्रूस प्रेमबळाने जिंकावे; हृदय पालट करावे; कारण हा विजय चिरकाल टिकणारा असतो.

अहिंसा हे शूरत्व आणि निर्भयतेचं लक्षण असतं; जो भ्याड आणि दुर्बल असतो तो अहिंसेचे पालन करू शकत नाही. मानवी जातीच्या उद्धाराकरिता हिंसा ही मारक आहे. तलवारीच्या बळावर मिळविलेले गमावलेही जाते परंतु अहिंसेने मिळविलेले दीर्घकाळापर्यत टिकत असते.1 म. गांधीजी हे अंहिसेचे नुसते शोधकच नव्हे तर साधकही होते. याविषयी गांधीजी म्हणत की, 'अहिंसा आणि सत्य ही माझी दोन फुफ्फुसे आहेत. अहिंसा या सिद्धांताचे सुंदर दर्शन गांधीजींना महावीर आणि बुद्ध यांच्या जीवनातून घडून आले होते. बुद्धाने जेव्हा अहिंसेचा आचार शिकविला तेव्हा समाजातील बहुसंख्य जनता पददलितांचेच जीवन जगत होती. राजसत्ताक आणि गणसत्ताक अशा दोन्ही राज्यांमध्ये अंतःकलह होता. आसुरी संस्कृतीचा प्रभाव असलेला अधःपती असा समाज असलेल्या या काळात गौतम बुद्धाने जीवन शुद्धीसाठी अहिंसेचा मंत्रोच्चार केला होता. बुद्धाचा त्याग हा नव्या लोकाचारासाठी होता. अशीच समाज  अवस्था ही गांधीजींच्या राजकीय पदार्पणाच्या काळात होती. एकंदरीत जर आपण विचार केला तर गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वावर बुद्ध आणि ख्रिस्त यांच्या जीवनश्रद्धांचा मोठा प्रभाव पडला होता. म्हणूनच महात्मा गांधींनी पारतंत्र्यातील आपल्या देशबांधवांना सांगितले की, 'महावीर आणि बुद्ध या गुरुदेवांच्या विचारात आपण सहभागी होऊन आपल्या मायभूमीला पुन्हा एकदा देवभूमी बनवू या.' हीच शूरांची अहिंसा महात्मा गांधींनी हिंसात्मक वातावरणातील समाजाला शिकविण्याचे कार्य केले.[2]

हिंसक कृत्यांपेक्षा अहिंसक कृत्यांनी अधिक प्रभावी दडपण आणता येते. कारण सदिच्छा आणि सभ्यपणा हा या दडपणाचा उगम असतो. असे असले तरी हे दडपण आत्मक्लेशातून विकसित अशा संघटित आत्मबलानेच आणता येते. अहिंसेने वाटचाल करणाऱ्यास कधीही निराश व्हावे लागत नसते. अशी गांधीजींची ठाम श्रद्धा होती.

सत्याग्रह म्हणजे न्यायासाठी भांडण, न्यायाच्या प्रस्थापनेसाठी आग्रह धरून बसणे. प्रत्येक व्यक्तीत ईश्वराचा म्हणजेच सत्याचा अंश असतो असे गृहीत आहे. शत्रुच्या मनात ईश्वरी अंश निद्रावस्थेत असतो त्यास जागे करण्याकरिता सत्याग्रहाचा मार्ग गांधीजींनी सांगितला.[3]

अहिंसा ही सर्व शक्तीमान असल्याने जेथे अहिंसा तेथे सत्य आणि सत्य म्हणजेच परमेश्वर होय. अशा सर्वव्यापी  परमेश्वराचे अस्तित्व ज्या ज्या ठिकाणी असते त्या त्या ठिकाणी सर्व काही कुशल व मंगल असेच असते. याविषयी गांधीजी म्हणत की, 'अहिंसा माझे साध्य नाही, माझे साध्य आहे सत्य.' मात्र मानवाच्या मानवी परस्परांच्या व्यवहारात सत्याच्या साक्षात्कारासाठी अहिंसेच्या व्यवहारावाचून दुसरे कोणते साध्य नाही,[4]

अहिंसेच्या परिमार्जनाकरिता गांधी म्हणत की, ''अहिंसेच्या कृत्याने काबूत आणली तरच परिस्थिती सुधारेल. हिंसेच्या अर्थाची व्याप्ती मी किती केली आहे. हे आपण लक्षात घ्यावे. लोभ, लबाडी, असत्य, कारस्थाने ही सर्वच हिंसेची कृत्ये किंवा लक्षणे होत. सरकारी अत्याचाराची प्रतिक्रिया सुशिक्षित किंवा विचारी लोकांवर विलक्षण होत आहे आणि ती दररोज वाढत आहे. या दुहेरी हिंसेला मला तोंड द्यावयाचे आहे.[5]

***अपरिग्रह :*** परिग्रह म्हणजे संचय करणे, सत्यशोधक अहिंसक माणूस परिग्रह करु शकत नाही. परिग्रहामुळे विषमता निर्माण होते. धनाढ्यांनी परिग्रह सोडला तर सर्वांना संतोष मिळू शकले. आदर्शभूत निःसीम अपरिग्रह तर, जो मनाने व कर्माने दिगंबर आहे त्याचाच होय. खऱ्या अर्थाने सुधारणेचे, खऱ्या संस्कृतीचे लक्षण परिग्राची वाढ नसून त्यांचे विचारपूर्वक व हेतूपूर्वक आकुंचन करणे हेच होय. आपण जसजसे परिग्रह कमी करीत जातो, तसतसे खरे सुख व खरा संतोषही वाढत जातो. सेवाशक्ति वाढते. सत्याच्या, आत्म्याच्या दृष्टीने विचार केल्यास शरीरसुद्धा परिग्रहच आहे. तसेच वस्तुंप्रमाणेच विचारांचाही अपरिग्रह घडला पाहिजे जे विचार ईश्वरापासून विन्मुख ठेवितात किंवा जे आपल्याला ईश्वरासनिध घेऊन जात नाहीत; त्यांची परिग्रहामध्येच गणना होते. अपरिग्रहाचे तत्त्व गांधीजींच्याआचरणाचा एक प्रमुख हिस्सा बनला होता. उभ्या आयुष्यातील एकच एक विमा पॉलिसीही त्यांनी रद्द केली होती.

***विश्वस्तांची संकल्पना :*** या संकल्पनेविषयी  गांधीजींचे उद्दिष्ट होते की, 'एक राष्ट्रकुटुंब असावे, ज्यात त्या राष्ट्राची इच्छा असल्यास त्यांनी जगाला आपल्यात जे सर्वोत्कृष्ट आहे ते देण्याकरिता आणि पाशवी शक्तीने नव्हे पण आत्मक्लेशाने जगातील दुर्बल राष्ट्रे किंवा वंश यांचे संरक्षण करण्याकरिता एकत्र यावे, सारे प्राणीमात्र माझ्या स्वतःच्या कुटुंबात मोडतात'' अशी विश्वबंधुत्वाची संकल्पना म.गांधींची होती.[6]

***रामराज्य :*** महात्मा गांधींना आदर्श समाजाकरिता भारतीय परंपरेतला शब्द हवा होता. त्याकरिता त्यांनी स्वाभाविकच रामराज्य हा शब्द निवडला. परंतु गांधीजींचे हे रामराज्य वाल्मिकि रामराज्यापेक्षा वेगळे होते. कारण वाल्मिकि रामराज्यात शंबूकाने तप आरंभिले म्हणून प्रभू रामचंद्राने केलेले शिरच्छेद, जानकीचा लोकापवादाचा केलेला त्याग, राज्यकारभारात दुष्कृत्याचा दोष रामाला देणे हे दोष होते.

महात्मा गांधींना खरे तर लोकराज्य हवे होते. माणसाच्या मूलभूत गरजांचा विचार करतांना कोणत्याही प्रकारचा भेद केला जात नाही. सर्वांचे मूल्य सारखेच असते.

महात्मा गांधींच्या दृष्टीने रामराज्यातील प्राणभूत तत्त्व म्हणजे सत्ता स्पर्धेचा अभाव होय. राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न हे चौघेही दशरथाच्या सिंहासनाचे अधिकारी परंतु सिंहासनाधिष्ठित कोणीही झाले नाही. यातच रामराज्याचे खरे सत्य आहे; रामराज्याचा खरा महिमा आहे. जेथे सर्वच हक्कदार पण उमेदवार कोणीच नाही ते रामराज्य; जेथे जितके हक्कदार तितकेच  उमेदवार व दावेदार ते रामराज्य होय. महात्मा गांधींना अपेक्षित रामराज्य म्हणजेच लोकराज्यात प्रतिनिधीत्व हवे होते पण उमेदवारी नको होती. लोकमताचे अधिष्ठान हवे होते.पण मतयाचनेचा तमाशा नको होता. महात्मा गांधीजींच्या रामराज्यात राव आणि रंक यांचा दर्जा समान होता. जो मजूर तोच हुजूर आणि जो हुजूर

तोच मजूर होता. म्हणजे ''राम राजा, राम प्रजा, राम सावकार'' असे होते.

***स्वराज्य :*** 'स्वराज्य म्हणजे आत्म–राज्य म्हणजे मोक्ष, स्वराज्य म्हणजे व्यक्तिच्या आणि राष्ट्राच्या अस्तित्वाची एक विशेष अवस्था आहे. स्वराज्य म्हणजे मृत्यूच्या भीतीचा त्याग, कष्ट करीत राहण्याची शक्ती होय.'[7]

***खादी :*** ग्रामोद्योगाचे पुनरुज्जीवन झाले तर आपल्या सर्व राष्ट्रीय जीवनाशीच पुर्नघटना होईल व बहुजनसमाजाच्या अंतःकरणात साधेपणा व कौटुंबिक वृत्ती यांचे ध्येय असेल. 'खादी तत्त्व' म्हणजे आपण खादीचे कपडे घालून चिंतिले पाहिजे की, 'दरिद्रनारायणाच्या भक्तीसाठी, भारतातील अन्नान्न करणाऱ्या कोट्यवधी बांधवासाठी मी ही खादी परिधान करीत आहे.' पृथ्वीतलावरील प्रत्येक मानवांविषयी बंधुभाव बाळगणे हा खादी तत्त्वाचा अर्थ होय.

***हिंदुधर्म :*** महात्मा गांधी हे स्वतःला 'सनातनी हिंदू' म्हणवीत. जो मनुष्य हिंदुस्थानात हिंदू कुळात जन्माला येऊन वेद,–उपनिषदे्–पुराणादि ग्रंथांना धर्मग्रंथ मानतो. सत्य–हिंसादि पाच यमांविषयी श्रद्धा बाळगून त्यांचे पालन करतो. आत्मा परमात्मा मानणे, मोक्ष परमपुरुषार्थ मानणे, वर्णाश्रम मानणे, परंतु आजच्या लौकिक आणि ढिल्या अर्थाने नव्हे; गोरक्षण मानणे असा मनुष्य हिंदू असतो असे गांधी मानत.

मानवप्राण्यांसह सर्व जीवनात एक आहे म्हणजे सर्व चैतन्य त्या एका विश्वशक्तीतून येते. मग त्या शक्तीला तुम्ही अल्ला म्हणा, गॉड म्हणा, परमेश्वर म्हणा – हा हिंदुधर्मात असलेला प्रत्यक्ष विश्वास हे त्याचे मुख्य मूल्य आहे.[8]

थोडक्यात महात्मा गांधींनी इतर तत्त्वज्ञानाप्रमाणे जरी ग्रंथस्वरुपात तत्त्वज्ञान दिले नसले तरी साम्राज्यशाही युरोपियनांनविरुद्ध निःशस्त्र लढा देऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. एवढेच नव्हेतर, पाश्चात्य साम्राज्यवादाला बळी पडलेल्या पारतंत्र्यातील देशांना आणि येथील समूह गटांना 'सत्य' आणि 'अहिंसा' ही परमतत्त्वे दिली. हाच स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग असल्याचे सिद्ध करून दिले. या प्रदीर्घ लढ्यात ब्रिटिशांच्या अन्याय–अत्याचाराविरुद्ध जनजागृतीकरिता केलेली भाषणे, लेख, शासनकर्त्यांना आणि समाजसेवकांना दिलेली पत्रे यातून त्यांचे तत्त्वज्ञान आपणास पहावयास मिळते. याकरिता गांधीजींनी सत्य व अहिंसावर आधारित सत्याग्रह, असहकार, कायदेभंग, उपोषणे, हरताळ या मार्गांनी चिरकाल लढा देऊन स्वातंत्र्य मिळवून दिले.

***संदर्भसूची***

1) पवार डी. जयसिंगराव, अर्वाचिन भारताचा आणि चीनचा इतिहास, मंजुश्री प्रकाशन, कोल्हापूर, मे 1995, पृ. 205–206.
2) वकील व्यंकटेश (संपा.), अहिंसा विचार (गांधी–विचार–दर्शन), खंड 20 वा, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीअंतर्गत, गांधी वाङ्मय प्रकाशन समिती, पुणे, 1964, पृ.3.
3) धर्माधिकारी भाऊ (संपा.), गांधी विचादर्शन, सत्याग्रहाचे प्रयोग, खंड 14, पुणे, 1995, पृ.3.
4) वकील व्यंकटेश (संपा.), उपरोक्त, पृ.9.
5) शिखरे दा. न. (संकलक), पत्रगुच्छ (गांधीजींनी लिहिलेल्या काही पत्रांचा संग्रह), महाराष्ट्र गांधी स्मारकनिधी प्रकाशन, गांधी भवन, पुणे, 1994, पृ. 12.
6) भारदे बाळासाहेब (संपा.), सत्याग्रहाची जन्मकथा, गांधी विचारदर्शन, खंड 5, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे, 1994, पृ. 143.
7) शिखरे दा. न. (अनुवादक), महात्मा गांधी यांचे संकलित वाङ्मय, 19, महात्मा गांधी वाङ्मय मराठी भाषांतर समिती, मुंबई, 1971, पृ.9.
8) शिखरे दा. न. (संपा.), गांधी विचारदर्शन अर्थकारण, खंड 13 वा, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे, 1993, पृ. 96–97.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org